0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :-
१) उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांचेकडून दि.१०/११/१० रोजी प्राप्त झालेली कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल /६-अ/प्र.क्र.१२८/२०१०/जा.८७०, दिनांक १२/११/२०१०, ०८/१२/२०१० व १५/१२/२०१०.
३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस ठाणे यांचे दि.१६/११/२०१०, दि.४/१२/२०१०, व दि.१३/१२/२०१० रोजीचे लेखी निवेदने.
४) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस ठाणे यांचे दि.२७/१२/२०१० चे लेखी अभिवेदन.
५) राजेश रोडलाईन्स प्रा.लि. चे बुकींग इन्चार्ज, कमलेशकुमार देवतादिन यादव यांचे दिनांक २७/१२/२०१० रोजीचे लेखी निवेदन.
६) प्लास्टीक पॉलीमेकर्स (आय) कंपनी, कुडाळ, जि. सिंधुदुर्गचे मालक युनूस मकनोजीया यांचे दिनांक २७/१२/२०१० रोजीचे लेखी निवेदन.
७) दक्षता शाखेकडून दिनांक १९/०७/२०११ रोजी प्राप्त झालेला रासायनिक पृथ:करण अहवाल.
८) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल /६-अ/प्र.क्र.१२८/२०१०/जा.६११, दिनांक २९/०७/२०११.
९) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस ठाणे यांचे दि.०८/०८/२०११ चे टपालामार्फत सादर केलेले लेखी अभिवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१२८/२०१०/जा. ६९९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २९/०८/२०११.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ०९/११/२०१० रोजी या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयाचे भरारी पथकातील अधिकारी हे पंचासह एकत्रीतपणे राजेश रोडलाईन्स प्रा.लि., गाळा नं. १०, पहिलवान इस्टेट, दिलशान हॉटेलच्या समोर, ९० फुट रोड, साकीनाका, मुंबई - ४०० ०७९ या ठिकाणी पोहचले. तेथे उपस्थित असलेल्या इसमास त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव कमलेशकुमार

देवतादिन यादव असे सांगून तो गेल्या १ महिन्यापासून राजेश रोडलाईन्स प्रा.लि. मध्ये बुकींक इनचार्ज म्हणून काम करीत असून राजेश रोडलाईन्सचे मालक सी.एन. सुमय्या हे त्यास मासिक रुपये ६,५००/- इतके वेतन देत असल्याचे त्यांनी पंचासमक्ष सांगितले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष त्यांच्या ट्रान्सपोर्टमध्ये असलेल्या २२० लिटर्स क्षमतेच्या लोखंडी ड्रममध्ये काय आहे, हे दाखविण्याची विनंती त्यांना केली असता. त्यांनी त्याच्या ताब्यात असलेल्या २२० लि. क्षमतेच्या १४ लोखंडी ड्रमची झाकणे उघडून दाखविली असता, पैकी १२ लोखंडी ड्रममध्ये केरोसिन सदृश्य द्रव पदार्थ आढळून आला. सदर केरोसिन सदृश्य द्रव पदार्थ कोणाचा आहे व तो ट्रान्सपोर्टद्वारे कुठे जाणार आहे. याबाबत अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष कमलेशकुमार यादव यांच्याकडे विचारणा केली असता. तो द्रवपदार्थ श्रीजी इंटरप्रायझेस, एच.आर. गोखले नगर, साईवाडी इमारती मागे, एन.एस. फडके मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९ यांनी मिक्स सॉल्वंट केमिकल म्हणून प्लास्टीक पॉलीमर्स लि. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग येथे पाठविण्यासाठी दिले असल्याचे पंचा समक्ष सांगितले. पैकी २२० लि. क्षमतेचे ८ लोखंडी ड्रम दिनांक ०८/११/२०१० रोजी श्रीजी इंटरप्रायझेस यांच्याकडून ताब्यात घेऊन त्यांना त्याबाबत अनुक्रमांक ०२८४८६० व ०२८४८५५ क्रमांकाच्या पावत्या देवून ८८० लिटर्सबाबतच्या दोन पावत्या दिल्या तर दिनांक ०९/११/२०१० रोजी २२० लिटर्स क्षमतेचे ४ लोखंडी ड्रम ताब्यात घेऊन ८८० लिटर्स बाबतची पावती क्रमांक ०२८४८७५ देण्यात आली. तसेच अधिकाऱ्यांनी ट्रांन्सपोर्ट खर्चाबाबतची विचारणा केली असता, सदरचा ट्रान्सपोर्टचा खर्च माल ताब्यात घेणारी कंपनी प्लास्टीक पॉलीमेकर्स (आय) लि. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ही कंपनी वरील साठा ताब्यात मिळाल्यानंतर देणार असल्याचे कमलेश यादव यांनी पंचा समक्ष सांगितले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शासन अनुदानीत दराने फक्त स्वयंपाकासाठीच शिधापत्रिकेवर वितरीत होणाऱ्या निळया केरोसिनची स्वतःच्या फायद्यासाठी अवैध मार्गाने प्राप्त करुन, त्याचे केरोसिन सदृश्य द्रवपदार्थामध्ये रुपांतर करुन व ते बेकायदेशीररित्या मिक्स सॉल्वंट म्हणून विक्री करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ (२) दि बॉम्बे रेशनिंग एरीया शेडयुल कमोडीटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर १९८६ चे कलम ४, ५, ६, ७, ८ (३) दि केरोसीन (रिस्ट्रीक्शन ऑन यूज ॲण्ड फिक्सेशन ऑफ सीलिंग प्रायसेस) ऑर्डर १९९३ चे कलम ३ तसेच (४) दि महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट व स्लोप (ॲक्विझीशन, सेल, स्टोरेज ॲन्ड प्रिव्हेन्शन ऑफ युज इन ऑटोमोबाईल) (अनुज्ञापन) ऑर्डर २००७ चे कलम ३ (सुधारीत आदेश २००९) चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द

साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई येथे स्था. गुन्हा नोंद क्र. १७७४/२०१० दि.१०/११/२०१० अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १२ लोखंडी ड्रममधील केरोसिन सदृश्य द्रवपदार्थ (२२० लि. क्षमतेच्या ड्रममधील) | २६४० लि. | १,००,३२०/- |
| २ | १२ लोखंडी २२० लिटर्स क्षमतेचे रिकामे ड्रम | १२ नग | ६,०००/- |
| | | एकूण | १,०६,३२०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. २६/११/२०१० रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दि. २६/११/२०१० रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी म्हणून पुढील सुनावणी दि. १३/१२/२०१० रोजी ठेवण्यात आली व तसे सर्व संबधितांना कळविण्यात आले.

दि. १३/१२/२०१० रोजीच्या सुनावणीस श्री व्ही. टी. तांबे, पोलीस उप निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन हे उपस्थित राहीले व त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे वाचावे क्र.३ अन्वये सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. सबब, पोलीसांनी केलेल्या विनंतीनुसार सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची अंतीम संधी म्हणून संदरची सुनावणी स्थगीत करुन पुढील सुनावणी दि. २७/१२/२०१० रोजी ठेवण्यात आली.

दि. २७/१२/२०१० रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उप निरिक्षक, श्री. संभाजी मोहिते, साकीनाका पोलिस स्टेशन हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस कमलेशकुमार देवतादिंन यादव व प्लास्टीक पॉलीमेकर्स (आय) कंपनी, कुडाळ, जि. सिंधुदुर्गचे मालक युनूस मकनोजीया हे उपस्थित राहिले व त्यांनी अनुक्रमे वाचावे क्र. ५ व ६ अन्वये त्यांचे लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही.

प्रस्तुत प्रकरणी जप्त केलेला द्रव पदार्थ कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच त्यात भेसळ होती किंवा कसे ? याकरीता रासायनिक पृथःकरण अहवालाची अत्यंत आवश्यकता असल्याचे सदरचा पृथःकरण अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रकरण अंतिम निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

तद्नंतर जप्त केलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यांचा रासायनिक पृथःकरण अहवाल, या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून वाचावे क्र.७ अन्वये प्राप्त झाला. सदर रासायनिक पृथःकरण अहवालाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी म्हणून वाचावे क्र. ८ अन्वये नोटीस बजावून पुढील सुनावणी दिनांक ०९/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी ग्रापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. तथापी, दरम्यान वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांनी त्यांचे वाचावे क्र. ९ अन्वये लेखी अभिवेदन टपालामार्फत सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात येत आहे.

<u>युक्तिवाद</u> :-

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांनी दि.०४/१२/२०१० रोजी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, सदर गुन्ह्याचे तपासात श्रीजी इंटरप्रायजेस कंपनीचा मालक बच्छुभाई विमा चौव्हाण यांना दि.२८/११/२०१० रोजी अटक करण्यात आली असून त्यास रिमांडकामी मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्याला ताब्यात घेवून जामीनावर मुक्त केले आहे. पोलिस कोठडी दरम्यान घटनास्थळी जप्त करण्यात आलेले १२ लोखंडी ड्रम मधील केरोसीन सदृश्य द्रव पदार्थ २६४० लिटर हे त्याने प्लस्टीक पॉलीमेकर्स, कंपनी, कुडाळ या कंपनीला पाठविण्यासाठी सदर ट्रान्सपोर्टमध्ये पाठविले असल्याचे सांगितले असून त्याने सदर गुन्ह्यातील नमूद केरोसिन सदृश्य द्रव पदार्थ त्याने कोठून मिळविले याबाबत त्याचेकडे कसून चौकशी केली असता, राजेंद्र व शुक्ला यांचेकडून फेरीने सदरचा द्रव पदार्थ खरेदी केला असल्याची माहिती दिली आहे. तसेच प्लॅस्टिक पॉलीमेकर्स (आय) कंपनी, कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्गचे मालक यांचा शोध घेणे चालू आहे, असे नमूद केले आहे.

दि.१३/१२/२०१० रोजीच्या सुनावणीस उपस्थित पोलिस उप निरिक्षक श्री व्ही. टी. तांबे यांनी सादर केलेल्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे निवेदनात, प्लॅस्टिक पॉलीमेकर्स (आय) कंपनी, कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्गचे मालक युनुस याकुब मकनोजीया यांना अटक करण्यात आली आहे. तसेच पाहिजे आरोपी राजेश ट्रान्सपोर्टचे

मालक सी. एन. सुमय्या याचा शोध घेतला असता, तो मिळून आला नसून तो मुंबई बाहेर गेला असल्याचे तपासात आढळून आले आहे व त्याचा शोध चालू आहे, असे नमूद केले आहे.

दि.२७/१२/२०१० रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उप निरिक्षक श्री संभाजी मोहिते यांनी युक्तीवाद केला की, पाहिजे आरोपी राजेश ट्रान्सपोर्टचे मालक सी. एन. सुमय्या याचा शोध घेतला असता, तो मिळून आला नसून तो मुंबई बाहेर गेला असल्याचे तपासात आढळून आले आहे व त्याचा शोध चालू आहे. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल केरोसीन सदृश्य द्रवपदार्थ यातील अटक आरोपीताना परत करण्यास पोलिसांची सक्त हरकत असून, जप्त मुद्देमाल केरोसिन सदृश्य द्रवपदार्थ असल्याने सदर मालाचे विल्हेवाटीबाबत लवकरात लवकर आदेश होण्यास विनंती आहे, असं सांगून तसे लेखी अभिवेदन सादर केले.

दि.२७/१२/२०१० रोजीच्या सुनावणीस उपस्थित कमलेशकुमार देवतादिन यादव यांनी युक्तिवाद केला की, ते राजेश रोडलाईन्स प्रा.लि., गाला नं.-१०, पहलवान इस्टेट, अप-दिलशान हॉटेल, ९० फिट रोड, साकीनाका, मुंबई ७२ कंपनीमध्ये साकीनाका शाखेत मागील अडीच महिन्यापासून बुकींगचे काम करीत आहेत. दिनांक ८/११/२०१० व ९/११/२०१० रोजी त्याने बिलात नमूद असल्याप्रमाणे १२ लोखंडी ड्रम मिक्स सॉल्वंटच्या नावावर बुक केले आहे. सदर द्रवपदार्थ पाठविण्याचे नांव श्री जी इन्टरप्रायजेस आहे व घेणाऱ्याचे नांव प्लॅस्टिक पॉलीमर्स (आय) लिमी., कुडाळ असे आहे. याबाबत यापूर्वीच अधिकाऱ्यांना सविस्तर सांगीतले असून, या मालाबाबत त्याचा व कंपनीचा कोणताही संबंध नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दि.२७/१२/२०१० रोजीच्या सुनावणीस उपस्थित प्लास्टीक पॉलीमेकर्स (आय) कंपनी, कुडाळ, जि. सिंधुदुर्गचे मालक युनूस मकनोजीया यांनी युक्तिवाद केला की, त्यांनी सदर मुद्देमालाची कोणतीही ऑर्डर दिलेली नसून ते सदर मुद्देमालाचा वापर करीत नाहीत. त्यांना सदर मुद्देमालाबाबत काहिहि माहिती नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

पृथ:करण अहवालाच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस स्टेशन यांनी दिनांक ०८/०८/२०११ रोजी सादर केलेल्या अहवालात, सदर गुन्ह्यातील जप्त द्रवपदार्थ हा केरोसीन असल्याबाबत पृथ:करण अहवालात नमुद केले असून, यातील जप्त मुद्देमाल शासन नियंत्रित केरोसीन असल्याने तो आरोपी यांना परत करण्यास पोलीसांची सक्त हरकत असल्याचे नमुद करुन सदर मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे लवकर आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

दिनांक ०९/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस जप्त मुद्देमालाचे मालक तसेच आरोपी / अपचारी उपस्थित राहीले नाहीत.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी पुढील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी दि.०९/११/२०१० रोजी या कार्यालयातील भरारी पथकाने घटनास्थळी दोन पंचासह छापा टाकून कमलेशकुमार देवतादिन यादव याचे ताब्यातील २२० लिटर क्षमतेचे १२ लोखंडी ड्रममधील २६४० लिटर केरोसिन सदृश्य द्रवपदार्थाचा साठा जप्त करण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणी श्री जी इंटरप्रायजेसचे मालक व राजेश रोडलाईन्सचे मालक यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. यावरुन त्यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसून कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे, जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे तसेच नोटीस मधील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

पोलीसानी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या अभिवेदनात, आरोपी श्रीजी इंटरप्रायजेस कंपनीचा मालक बच्छुभाई विमा चौव्हाण याचेकडे पोलिस कोठडी दरम्यान सदर गुन्ह्याचे तपासात चौकशी केली असता, घटनास्थळी जप्त करण्यात आलेले १२ लोखंडी ड्रम मधील २६४० लिटर केरोसीन सदृश्य द्रव पदार्थ हे त्याने प्लॅस्टीक पॉलीमेकर्स, कंपनी कुडाळ या कंपनीला पाठविण्यासाठी सदर ट्रान्सपोर्ट मध्ये पाठविले असल्याचे सांगितले असून त्याने सदर गुन्ह्यातील नमूद केरोसिन सदृश्य द्रव पदार्थ त्याने कोठून मिळविले याबाबत त्याचेकडे कसून चौकशी केली असता, राजेंद्र व शुक्ला यांचेकडून फेरीने सदरचा द्रव पदार्थ खरेदी केला असल्याची माहिती दिली आहे. तसेच सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल केरोसीन सदृश्य द्रवपदार्थ यातील अटक आरोपीताना परत करण्यास पोलिसांची सक्त हरकत असून, जप्त मालाचे विल्हेवाटीबाबत लवकरात लवकर आदेश होण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे. तसेच आरोपी, प्लास्टीक पॉलीमेकर्स (आय) कंपनी, कुडाळ, जि. सिंधुदुर्गचे मालक युनूस मकनोजीया यांनी युक्तिवाद केला की, त्यांनी सदर मुद्देमालाची कोणतीही ऑर्डर दिलेली नसून ते सदर मुद्देमालाचा वापर करीत नाहीत. त्यांना सदर मुद्देमालाबाबत काहिहि माहिती नाही, असे नमुद केले आहे.

तसेच आरोपी राजेश रोडलाईन्स प्रा.लि. चे बुकींग इन्चार्ज, कमलेशकुमार देवतादिन यादव यांनी सुनावणीच्यावेळी दिलेल्या खुलाशात, दिनांक ८/११/२०१० व ९/११/२०१० रोजी त्याने बिलात नमूद असल्याप्रमाणे श्री जी इन्टरप्रायजेस यांचेकडून प्लॅस्टिक पॉलीमर्स (आय) लिमी., कुडाळ यांना पाठविण्याकरीता १२ लोखंडी ड्रम मिक्स सॉल्वंटच्या नावावर बुक केले आहे. या मालाबाबत त्याचा व कंपनीचा कोणताही संबंध नाही, असे नमूद केले आहे. तसेच घटनास्थळी दिलेल्या जबाबातही जप्त मुद्देमाल मिक्स सॉल्वंट केमिकल म्हणून वरील नमुद कंपनीला पाठविण्याकरीता दिले होते, असे नमूद केले आहे. तथापी, प्लास्टीक पॉलीमेकर्स (आय) कंपनी, कुडाळ,



0006

जि. सिंधुदुर्गचे मालक युनूस मकनोजीया यांनी सदर मुद्देमालाची कोणतीही ऑर्डर दिलेली नसून ते सदर मुद्देमालाचा वापर करीत नाहीत. तसेच याबाबत त्यांना काहिहि माहिती नसल्याचे खुलाशात नमुद केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या द्रवपदार्थाचे नमुने न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालिना यांचेकडे रासायनिक पृथ:करणासाठी पाठविण्यात आला असता, त्यांचेकडून रासायनिक पृथ:करण अहवाल प्राप्त झाला असून, सदर अहवालात, Exhibit contains kerosene... असे नमुद केले आहे. म्हणजेच सदर गुंन्ह्यात जप्त केलेला द्रवपदार्थ हा केरोसीन असल्याचे स्पष्ट होते.

आरोपी राजेश रोडलाईन्स प्रा.लि. चे बुकींग इन्चार्ज, कमलेशकुमार देवतादिन यादव यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात, जप्त १२ लोखंडी ड्रममधील मुद्देमाल मिक्स सॉल्वंट केमिकल म्हणून प्लास्टीक पॉलीमेकर्स (आय) कंपनी, कुडाळ या कंपनीला पाठविण्याकरीता दिले होते, असे नमूद केले असून, पोलीसांनी सदर आरोपीकडे केलेल्या चौकशीत, जप्त करण्यात आलेले १२ लोखंडी ड्रम मधील २६४० लिटर केरोसीन सदृश्य द्रव पदार्थ हे त्याने प्लास्टीक पॉलीमेकर्स, कंपनी कुडाळ या कंपनीला पाठविण्यासाठी सदर ट्रान्सपोर्ट मध्ये पाठविले असल्याचे सांगितले, असे पोलीसांनी सुनावणीच्या वेळी दिलेल्या खुलाशात नमूद केले आहे. तसेच सदर गुन्ह्यात जप्त केलेला द्रवपदार्थ हा केरोसीन असल्याचा पृथ:करण अहवाल न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेला आहे. यावरुन आरोपी यास ज्ञात असतांना सुध्दा त्यांनी सबंधिताशी संगणमत करुन जाणीवपूर्वक शासन नियंत्रीत निळे रंगाचे केरोसिन गैरमार्गाने मिळवून, स्वत:च्या फायद्यासाठी त्यामध्ये भेसळ करुन त्याची मिक्स सॉल्वंट म्हणून विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या साठवणूक केल्याचे सकृतर्शनी दिसून येते. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई येथे स्था. गुन्हा नोंद क्र. १७७४/२०१० दि.१०/११/२०१० मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FFICE

## आदेश :-

१) जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा एकुण २६४० लिटर साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेले सदरचे निळे केरोसिन उपनियंत्रक शिधावाटप, ई-परिमंडळ कार्यालय, वडाळा यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांस, पोलीसांनी नियंत्रीत दराने विक्री करुन येणारी रक्कम पोलीसांनी शासनज़मा करावी.

३) जप्त करण्यात आलेले २२० लिटर्स क्षमतेचे १२ लोखंडी रिकामे ड्रम या वस्तूची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) कमलेशकुमार देवतादिन यादव, राजेश रोडलाईन्स प्रा.लि.चे बुकींक इनचार्ज.
२) सी.एन. सुमय्या, राजेश रोडलाईन्स प्रा. लि. चे मालक.
३) श्रीजी इंटरप्रायझेसचे मालक
४) प्लास्टीक पॉलीमेकर्स (आय) कंपनी, कुडाळ, जि. सिंधुदुर्गचे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलीस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.